प्रशासकीय विभागातंर्गत खरेदीसाठी समिती गठीत करणे.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक:-सीओएम-२०१५/प्र.क्र.१८/संगणक कक्ष
मादाम काम मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २० जानेवारी, २०१६

वाचा - १) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र.१७१/अर्थ-३, दिनांक १६ जानेवारी, २०१६.

प्रस्तावना-

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका प्रसिध्द केली आहे. उक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार, प्रशासकीय विभागांनी त्यांच्या कार्यालयांसाठी खरेदी करण्यात यावी, अशा सूचना वित्त विभागाने संदर्भीय अनुक्रमांक २ येथील परिपत्रकान्वये दिल्या आहेत. नियम पुस्तिकेच्या परिच्छेद क्रमांक २.९.२ मध्ये नमूद केल्यानुसार सर्व प्रशासकीय विभागांना खरेदी प्रक्रिया पार पाडता यावी, यासाठी प्रत्येक प्रशासकीय विभाग/कार्यालयांतर्गत खरेदी समिती गठीत करावयाची आहे. त्यानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत खरेदी समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये प्रसिध्द केलेल्या नियमपुस्तिकेत विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार खरेदी प्रक्रिया हाती घेण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागासाठी खालीलप्रमाणे खरेदी समिती गठीत करण्यात येत आहे:-

१. प्रधान सचिव/सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग)	:	अध्यक्ष
२. सह सचिव/उप सचिव (आस्था-२)	:	सदस्य
३. अवर सचिव (आस्था-२)	:	सदस्य सचिव
४. लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ किंवा गट-ब दर्जाचा लेखाधिकारी	:	निमंत्रित
५. उद्योग सह संचालक (भांख)/ उद्योग संचालनालयाचा प्रतिनिधी	:	निमंत्रित
६. अन्य विभागाकडून कोणताही निमंत्रित, आवश्यकता असल्यास	:	निमंत्रित
७. तांत्रिक तज्ञ, आवश्यकता असल्यास	:	निमंत्रित

२. नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक २.१० मधील तरतूदीनुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने पुरवठादाबरोबर करार करण्यासाठी संबंधित विषयाचे अवर सचिव (गट-अ), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांना नामनिर्देशित करण्यात येत आहे.

३. नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक २.९.२ मधील तरतूदीनुसार विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन खरेदी करावयाच्या बाबीसंबंधात सर्व निर्णय उक्त समितीला घेता येईल. जर खरेदीचे अंदाजित मूल्य रुपये १०,००,०००/- पेक्षा कमी (रुपये दहा लाखापेक्षा कमी) असेल तर, विभाग प्रमुखाला खरेदी संबंधी उक्त खरेदी समितीची बैठक न बोलविता निर्णय घेण्याचा अधिकार असेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक- २०१६०१२०१५२३२९७९२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh Ramchandra Dingle

Digitally signed by Dinesh Ramchandra Dingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400051, st=Maharashtra, cn=Dinesh Ramchandra Dingle
Date: 2016.01.20 15:24:31 +05'30'

(दि.रा.डिंगळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. महालेखापाल महाराष्ट्र - १ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
२. महालेखापाल (लेखापरीक्षा), मुंबई.
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४. संचालक, लेखा व कोषागारे, प्रशासकीय इमारत, मुंबई.
५. संचालक, उद्योग संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
८. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/ कक्ष अधिकारी.
९. उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग-४), मंत्रालय, मुंबई-३२
१०.उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-७) , मंत्रालय, मुंबई-३२
११.निवडनस्ती.